॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

# Shri Navnath Bhaktisar

## ADHYAYA 19 — EKONAVIMSHODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

***Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |***


### Summary

*Chapter 19 follows Gorakshanath traveling toward the Kingdom of Women to retrieve his guru, Machindranath, fulfilling an old promise linked to Hanuman. To avoid revealing his identity too early, Gorakshanath travels in disguise. He meets Kalinga, the chief courtesan traveling to perform for Queen Mainakini, and joins her under the pseudonym Poorvada. To win her trust, he demonstrates his mastery by making trees and stones sing and transforming iron into gold. Upon reaching the border, he seals it with four mystical weapons—Vajra, Sparsha, Mohana, and Naga—before making camp at Chinapattan.*

*That night, Hanuman crosses the border and is struck down by the trap. Near death, he prays desperately to Rama, who arrives immediately to neutralize the weapons and revive him. Discovering that a Nath devotee is responsible, Rama restrains a furious Hanuman. Disguised as Brahmins, Rama and Hanuman confront Gorakshanath at Chinapattan. After testing his resolve, they reveal their true forms and press him to leave Machindranath in the kingdom, as Mainakini's intense austerities had earned his presence. Gorakshanath fiercely refuses, declaring he would rather fight than abandon his guru, but ultimately yields out of supreme respect for Rama's explicit wish. Satisfied, Rama and Hanuman depart, setting the stage for Hanuman to secretly forewarn Mainakini's court of Gorakshanath's approach.*


### Ovee 1

जयजयाजी जगद्गुरुराजा । सर्वज्ञ विजय भोजा । भवाब्धी भवसरिते काजा । साधक नौका असती तूं ॥

#### Transliteration

**Jaya-jaya-ji Jagad-guru-raajaa | Sarva-jnya vijaya bhojaa | Bhava-abdhee bhava-sarite kaajaa | Saadhaka naukaa asasee too ||**

### Ovee 2

हे पूर्णब्रह्मानंद कंदा । पुढें बोलवीं भक्ती अतिमोदा । तुझी लीला अगाधा । भक्तिसारग्रंथातें ॥

#### Transliteration

**Hey Poorna-brahma-ananda kandaa | Pudhe bolavee bhaktee ati-modaa | Tujhee leelaa agaadhaa | Bhakti-saara-granthaate ||**

## Ovee 3

मागिले अध्यायी वदविले गहन । श्रीगोपीचंदाचें उदार कथन । बद्रिकाश्रमीं तप करुन । तीर्थाटणीं निघाला ॥

### Transliteration

**Maagile adhyaayee vadavile gahanu | Shree-Gopeechandaache udaara kathanu | Badrikaa-ashramee tapa karunu | Teertha-atanee nighaalaa ||**

## Ovee 4

याउपरी ऐकिजे श्रोतीं । सिंहावलोकनीं विश्रांती । गोरक्ष कानिफाचे युक्ती । स्त्रीराज्यांत जातसे ॥

### Transliteration

**Yaa-uparee aikije shrotee | Sinha-avalokanee vishraantee | Goraksha Kaaniphaache yuktee | Stree-raajyaanta jaatase ||**

## Ovee 5

मार्गी चालतां मुक्कामोमुक्काम । सदा श्रीगुरुचें आठवी नाम । ग्रामांत करुनि भिक्षाटण । पुढें मार्ग क्रमीतसे ॥

### Transliteration

**Maargee chaalataa mukkaam-o-mukkaamu | Sadaa Shree-Guru-che aathavee naamu | Graamaanta karuni bhikshaa-atanu | Pudhe maarga krameetase ||**

## Ovee 6

ऐसिया स्थितीं गौडबंगाल । सांडूनि सांडिला बंगालकौल । पुढें जात स्त्रीराज्यांत वहिला । सीमेपर्यंत पातला ॥

### Transliteration

**Aisiyaa sthitee Gauda-Bangaalu | Sanduni saandilaa Bangaala-Kaulu | Pudhe jaata Stree-raajyaanta vahilaa | Seeme-paryanta patalaa ||**

## Ovee 7

परी विचारी स्वमनांत । श्रीगुरुराज आहेत तेथ । राजवैभव बहु सामर्थ्य । संपत्तीचें मिरवतसे ॥

### Transliteration

**Paree vichaaree sva-manaantu | Shree-Guru-raaja aaheta tethu | Raaja-vaibhava bahu saamarthyu | Sampatteeche miravatase ||**

## Ovee 8

ऐसे वैभवमानी सुखप्रकरणीं । मातें ओळखील कैसा कोणी । श्रीमंतापुढें हीन दीन । मान्यत्वानें मिरवेना ॥

### Transliteration

**Aise vaibhava-maanee sukha-prakaranee | Maate olakheela kaisaa konee | Shreemanta-pudhe heena deenu | Maanyatvaane miravenaa ||**

### Ovee 9

जेवी अर्कापुढें खद्योत । हीन दीन अति दिसत । तेवीं मज कंगालवंतातें । कोण तेथें ओळखील ॥

#### Transliteration

**Jevee Arka-pudhe khadyotu | Heena deena ati disatu | Tevee maja kangaala-vantaate | Kona tethe olakheelu ||**

### Ovee 10

मेरुपुढें मशक स्थिती । कोण वर्णावी कवण अर्थीं । कीं पुढें बैसल्या वाचस्पती । मैंद वल्गना मिरवीना ॥

#### Transliteration

**Meru-pudhe mashaka sthitee | Kona varnaavee kavana arthee | Kee pudhe baisalyaa Vaachaspatee | Mainda valganaa miraveenaa ||**

### Ovee 11

कीं हिरातेज पडिपाडा । गार ठेऊनि पुढां । परीस पालटा देतां दगडा । योग्यायोग्य साजेना ॥

#### Transliteration

**Kee hiraa-teja padipaadaa | Gaara theuni pudhaa | Pareesa paalataa detaa dagadaa | Yogya-yogya saajenaa ||**

### Ovee 12

सुवर्ण मिरवे राशी सोळा । तेथें दगडाचा पाड केतुला । तेवीं मातें संपत्ती मिरवला । ओळखील कैसा तो ॥

#### Transliteration

**Suvarna mirave raashee solaa | Tethe dagadaachaa paada ketulaa | Tevee maate sampattee miravalaa | Olakheela kaisaa toh ||**

### Ovee 13

असो याउपरी दुसरे अर्थी । मम नाम कळतां मच्छिंद्राप्रती । परम द्वाड लागेल चित्तीं । सुखसंपत्ती भोगितां ॥

#### Transliteration

**Aso yaa-uparee dusare arthee | Mama naama kalataa Machchindraa-pratee | Parama dvaada laagela chittee | Sukha-sampattee bhogitaa ||**

### Ovee 14

जैसें जेवितां षड्रस अन्न । तैं कडुवट सेवी कोण । तेवीं मच्छिंद्र संपत्तीतें टाकून । जाईल कैसा बैरागी ॥

#### Transliteration

**Jaise jevitaa shad-rasa annu | Tai kaduvata sevee konu | Tevee Machchindra sampatteete taakunu | Jaaeela kaisaa bairaagee ||**

## Ovee 15

यापरी आणि तिसरे अर्था । मम नाम श्रीगुरुलागीं कळतां । नेणों कल्पना वरुनि चित्ता । वर्तेल घाता माझिया ॥

### Transliteration

**Yaa-paree aani tisare arthaa | Mama naama Shree-Guru-laagee kalataa | Neno kalpanaa varuni chittaa | Vartela ghaataa maajhiyaa ||**

## Ovee 16

मग तयाच्या सवें विद्यारळी । करावी आपण बांधूनि कळीं । हे तों कोड येणें काळीं । मजप्रती योग्य भासेना ॥

### Transliteration

**Maga tayaa-chyaa save vidyaa-ralee | Caraavee aapana baandhuni kalee | Hey toh koda yene kaalee | Majapratee yogya bhaasenaa ||**

## Ovee 17

ज्या स्वामींचें वंदितों चरण । तयासीं विद्येची रळी खेळेन । हें योग्य मातें नव्हे जाण । अपकीर्ति ब्रह्मांड भरी ॥

### Transliteration

**Jyaa svaameenche vandito charanu | Tayaasee vidyechee ralee khelenu | Hey yogya maate navhe jaanu | Apakeerti Brahmaanda bharee ||**

## Ovee 18

ऐसें तर्किवितर्क करितां । श्रीगोरक्ष मार्गीं रमतां । तों वेश्याकटक देखिलें तत्त्वतां । स्त्रीराज्यांत जाती त्या ॥

### Transliteration

**Aise tarkivitarka karitaa | Shree-Goraksha maargee ramataa | Toh veshyaa-kataka dekhile tattvataa | Stree-raajyaanta jaatee tyaa ||**

## Ovee 19

तों सकळ वेश्यांची मुख्य कामिनी । गुणभरिता कलिंगानाम्नीं । तिचें स्वरुप वर्णितां वाणी । रतिपति आतळेना ॥

### Transliteration

**Toh sakala veshyaanchee mukhya kaaminee | Guna-bharitaa Kalingaa-naamneen | Tiche svarupa varnitaa vaanee | Rati-pati aatalenaa ||**

## Ovee 20

जिचे पाहतां मुखकमळा । शशितेजाहूनि अति निर्मळ । परम लज्जित चपळा केवळ । होऊनि ढगीं रिघताती ॥

### Transliteration

**Jiche paahataa mukha-kamalaa | Shashi-teejaa-huni ati nirmalu | Parama lajjita chapalaa kevelu | Houni dhagee righataatee ||**

## Ovee 21

जिचा नेत्रकटाक्षबाण । तपस्व्यांचें वेधीत मन । मग विषयें लंपट अपार जाण । कवण अर्थीं वर्णावे ॥

### Transliteration

**Jichaa netra-kataaksha-baanu | Tapasvyaanche vedheeta manu | Maga vishaye lampata apaara jaanu | Kavana arthee varnaave ||**

## Ovee 22

ऐसियेपरी सुलक्षण दारा । चातुर्यकलिका गुणगंभीरा । जिचे नाम साजोतरा । कीं हिरागारा मिरवती ॥

### Transliteration

**Aisiye-paree su-lakshana daaraa | Chaaturya-kalikaa guna-gambheeraa | Jiche naama saajotaraa | Kee hiraa-gaaraa miravatee ||**

## Ovee 23

जिचें सुस्वर विपुल गायन । ऐकतां गंधर्व करिती खालती मान । अप्सरा परम लज्जित होऊन । सेवा इच्छिती जियेची ॥

### Transliteration

**Jiche su-svara vipula gaayanu | Aikataa khaalatee Gandharva caritee maanu | Apsaraa parama lajjita hounu | Sevaa ichchitee jiyechee ||**

## Ovee 24

ऐशापरी ती कलिंगदारा । जात स्त्रीदेशांत अवसरा । तैं अवचित तीतें गोरक्ष उदारा । देखता झाला निजदृष्टीं ॥

### Transliteration

**Aishaa-paree tee Kalinga-daaraa | Jaata Stree-deshaanta avasaraa | Tai avachita teete Goraksha udaaraa | Dekhataa jhaalaa nija-drishtee ||**

## Ovee 25

मग तो जवळी योगद्रुम । जाऊनि पुसे तियेचें नाम । येरी म्हणे कलिंगा उत्तम । नाम असे या देहा ॥

### Transliteration

**Maga toh javalee yoga-drumu | Jauni puse tiyeche naamu | Yeree mhane Kalingaa uttamu | Naama ase yaa dehaa ||**

## Ovee 26

येरु म्हणे कवणार्थी । जातां कोणत्या ग्रामाप्रति । कलिंगा म्हणे स्त्रीदेशाप्रती । जाणें आहे आमुतें ॥

### Transliteration

**Yeru mhane kavana-arthee | Jaataa konatyaa graamaa-prati | Kalingaa mhane Stree-deshaapratee | Jaane aahe aamute ||**

## Ovee 27

राव मैनाकिनी पद्मिनी । सकळ स्त्रियां देशस्वामिनी । तियेतें नृत्यकळा दावूनी । वश्य करणें आहे जी ॥

### Transliteration

**Raava Mainaakinee Padminee | Sakala striyaa desha-svaaminee | Tiyete nritya-kalaa daavuunee | Vashya karane aahe jee ||**

## Ovee 28

ती राजपद्मिनी वश्य होतां । अपार देईल आमुतें वित्ता । यापरी कामना योजूनि चित्ता । गमन करितों आम्ही कीं ॥

### Transliteration

**Tee raaja-padminee vashya hotaa | Apaara deeela aamute vittaa | Yaa-paree kaamanaa yojuni chittaa | Gamana karito aamhee kee ||**

## Ovee 29

ऐसा वृत्तांत ऐकूनि युवती । हृदयीं विचारी योगपती । कीं इचीच शुद्ध धरुनि संगती । प्रविष्ट व्हावें त्या स्थानीं ॥

### Transliteration

**Aisaa vrittaanta aikuni yuvatee | Hridayee vichaaree yogapatee | Kee ichee-chha shuddha dharuni sangatee | Pravishta vhaave tyaa sthaanee ||**

## Ovee 30

मग सहजस्थितीनें गमना । आव्हानूनि दृष्टीं राजसदना । गुप्तवेषें श्रीगुरुकामना । अवगमूनि घ्यावी तों ॥

### Transliteration

**Maga sahaja-sthiteene gamanaa | Aavhaanuni drishtee raaja-sadanaa | Gupta-veshe Shree-Guru-kaamanaa | Avagamuni ghyaavee toh ||**

## Ovee 31

ऐसा विचार करुनि चित्तीं । बोलता झाला तिये युवती । म्हणे मी येतों तुमच्या संगतीं । न्याल तरी कीं कृपेनें ॥

### Transliteration

**Aisaa vichaara karuni chittee | Bolataa jhaalaa tiye yuvatee | Mhane mee yeto tumachyaa sangatee | Nyaala taree kee kripene ||**

## Ovee 32

येरी म्हणे नरेंद्रोत्तमा । येऊं पाहसी संगती आम्हां । तरी कुशळपणी काय तुम्हां । भोंवरिली विद्या जे ॥

### Transliteration

**Yeree mhane narendra-uttamaa | Yeoo paahasee sangatee aamhaa | Taree kushala-panee kaaya tumhaa | Bhovarilee vidyaa je ||**

## Ovee 33

येरु म्हणे करुनि गायन । तुम्हांसवें चातुर्य मानून । आणि मृदंगवाद्य वाजवीन । कुशळपणें नेटका ॥

### Transliteration

**Yeru mhane karuni gaayanu | Tumhaan-save chaaturya maanunu | Aani mridanga-vaadya vaajaveenu | Kushala-pane netakaa ||**

## Ovee 34

येरी म्हणे गाणें वाजविणें । येतसे चातुर्यवाणें । तरी प्रथमारंभीं आम्हां दाविणें । कैसे रीतीं कुशलत्व ॥

### Transliteration

**Yeree mhane gaane vaajavine | Yetase chaaturya-vaane | Taree prathama-arambhee aamhaa daavine | Kaise reetee kushalatvu ||**

## Ovee 35

येरु म्हणे जी काय उशीर । आतांचि पहावा चमत्कार । हातकंकणा आदर्शव्यवहार । कामया पाहिजे दृष्टीतें ॥

### Transliteration

**Yeru mhane jee kaaya usheeru | Aataanchi pahaavaa chamatkaaru | Haata-kankanaa aadarsha-vyavahaaru | Kaamayaa paahije drishteete ||**

## Ovee 36

कीं स्पर्शतां शुद्ध अमरपण । होय न होय केलिया पान । कीं स्पर्शिल्या परिसोन । न होय भ्रांती मिरवेल काय ॥

### Transliteration

**Kee sparshataa shuddha amara-panu | Hoya na hoya keliyaa paanu | Kee sparshilya parisonu | Na hoya bhraantee miravela kaayu ||**

## Ovee 37

तरी आतां या ठायीं । मम विद्येची परीक्षा घ्यावी । ऐसें ऐकतांचि कलिंगा महीं । सदनाहूनि उतरली ॥

### Transliteration

**Taree aataa yaa thaayee | Mama vidyechee pareekshaa ghyaavee | Aise aikataanchi Kalingaa mahee | Sadanaa-huni utaralee ||**

## Ovee 38

महीतळीं घालूनि आसन । सारंगी देत आणून । म्हणे नवरसें कुशलत्वपण । कळा दावीं कोणती ॥

### Transliteration

**Mahee-talee ghaaluni aasanu | Sarangee deta anunu | Mhane nava-rase kushalatva-panu | Kalaa daavee konatee ||**

## Ovee 39

ऐसी ऐकूनि तियेची गोष्टी । करीं कवळूनि भस्मचिमुटी । गंधर्वप्रयोग होटीं । जल्पूनि भाळीं चर्चीतसे ॥

### Transliteration

**Aisee aikuni tiyechee goshtee | Karee kavaluni bhasma-chimutee | Gandharva-prayoga hotee | Jalpuni bhaalee charcheetase ||**

## Ovee 40

चर्चूनि दाही दिशा प्रेरीतसे । आणि चतुर्थवाद्यातें स्पर्शीतसे । ऐसें झालिया हुंकार देतसे । गावें वाजवावें म्हणूनिया ॥

### Transliteration

**Charchuni daahee dishaa prereetase | Aani chaturtha-vaadyaate sparsheetase | Aise jhaaliyaa hunkaara detase | Gaave vaaja-vaave mhanuni-yaa ||**

## Ovee 41

तरी काननीं तरु पाषाण । जल्पती गंधर्वासारखें गायन । तंतवितंत सुस्वरी गायन । वाजवी वाद्य चातुर्य हो ॥

### Transliteration

**Taree kaananee taru paashaanu | Jalpatee gandharva-saarakhe gaayanu | Tanta-vitantatu su-svaree gaayanu | Vaajavee vaadya chaaturya ho ||**

## Ovee 42

आपुलें आपण वाद्य वाजविती । पाषाण तरु गायन करिती । हें पाहूनि कलिंगा युवती । आश्चर्य करी मानसीं ॥

### Transliteration

**Aapule aapana vaadya vaajavitee | Paashaana taru gaayana karitee | Hey pahuni Kalingaa yuvatee | Aashcharya caree maanasee ||**

## Ovee 43

स्वमुखीं ओपूनि मध्यमांगुळी ती । विस्मय करी आपुल्या पोटीं । चित्ती म्हणे हा नरधूर्जटी । ईश्वरतुल्य भासतसे ॥

### Transliteration

**Sva-mukhee opuni madhyama-angulee tee | Vismaya caree aapulyaa potee | Chittee mhane haa nara-dhoorjatee | Eeshvara-tulya bhaasatase ||**

## Ovee 44

जो पाषाणतरुहातीं गायन । करवीत गंधर्वा सरी आपण । तयालागीं स्वतां गायन । अशक्य काय करावया ॥

### Transliteration

**Jo paashaana-taru-haateee gaayanu | Karaveeta gandharvaa saree aapanu | Tayaa-laagee svataa gaayanu | Ashakya kaaya karaavayaa ||**

### Ovee 45

जो पाषाणी पिंवळेपण । करुं जाणे लोहाचें सुवर्ण । तयालागीं परिसमणी । करावया अशक्य म्हणावें कीं ॥

#### Transliteration

**Jo paashaanee pinvale-panu | Karu jaane lohaache suvarnu | Tayaa-laagee parisa-manee | Karaavayaa ashakya mhanaave kee ||**

### Ovee 46

जेणें बुरंट गौतमीकांसेखालीं । सर्व पदार्थ मही उद्धरिली । त्यातें कामधेनु निर्माया भली । परम अशक्यता न बोलावी ॥

#### Transliteration

**Jene buranta Gautamee-kaansee-khaalee | Sarva padaartha mahee uddharilee | Tyaate kaama-dhenu nirmaayaa bhalee | Parama ashakyataa na bolaavee ||**

### Ovee 47

कीं कोणत्याही वृक्षाखालीं । कामना पुरवी सकळी । ते कल्पतरुमेळीं । अनायासें शोभतसे ॥

#### Transliteration

**Kee kona-tyaa-hee vriksha-khaalee | Kaamanaa puravee sakalee | Tey kalpa-taru-melee | Anaayaase shobhatase ||**

### Ovee 48

तन्न्यायें वृक्षपाषाणी । आणिली ज्यानें गंधर्वमांडणी । तो स्वतः सिद्ध कुशलपणीं । गाणार नाहीं कां बोलावें ॥

#### Transliteration

**Tan-nyaaye vriksha-paashaanee | Aanilee jyaane gandharva-maandanee | Toh svatah siddha kushala-panee | Gaanaara naahee kaa bolaave ||**

### Ovee 49

तरी आतां असो कैसें । आपणचि रहावें याचे संगतीस । ऐसा विचार करुनि स्वचित्तास । बोलती झाली विव्हळा ॥

#### Transliteration

**Taree aataa aso kaise | Aapanachi rahaave yaache sangateesu | Aisaa vichaara karuni sva-chittaasu | Bolatee jhaalee vivhalaa ||**

### Ovee 50

म्हणे महाराजा सद्गुण करितां । मी दिन किंकर अनाथा । ऐसा काम उदेला चित्ता । तरी सिद्धार्थ आव्हानीं ॥

#### Transliteration

**Mhane Mahaaraajaa sad-guna karitaa | Mee dina kinkara anaathaa | Aisaa kaama udelaa chittaa | Taree siddha-artha aavhaanee ||**

### Ovee 51

अगाध वर्णनाची सविताराशी । दैवें उदेली मम तमगुणासी । तरी संज्ञा जे बोलिलासी । तेंचि सिद्ध आव्हानीं ॥

#### Transliteration

**Agaadha varnana-achee Savitaa-raashee | Daivee udelee mama tama-gunaasee | Taree sanjnyaa je bolilaasee | Tenchi siddha aavhaanee ||**

### Ovee 52

तरी महाराजा विद्यार्णवा । जगीं मिरविसी कोणत्या भावा । ऐसें पुसतां गोरक्ष जीवा । परम कल्पना योजीतसे ॥

#### Transliteration

**Taree Mahaaraajaa vidya-arnavaa | Jagee miravisee konatyaa bhaava | Aise pusataa Goraksha jeevaa | Parama kalpanaa yojeetase ||**

### Ovee 53

चित्तीं म्हणे नामाभिधान । प्रविष्ट न करावें इजकारण । गुप्त ठेविल्यासी कार्यसाधन । घडून येईल पुढारां ॥

#### Transliteration

**Chittee mhane naama-abhidhaanu | Pravishta na charaave ijakaaranu | Gupta thevilyaasee kaarya-saadhanu | Ghaduna yaeela pudhaaraa ||**

### Ovee 54

ऐसा विचार करुनी । म्हणे ऐकें शुभाननी । पूर्वडा नाम देहालागुनी । जगामाजी मिरवतसे ॥

#### Transliteration

**Aisaa vichaara karunee | Mhane aike shubha-aananee | Poorvadaa naama dehaa-laagunee | Jagaa-maajee miravatase ||**

### Ovee 55

येरी म्हणे पूर्वडराया । अर्थकाम कोण हृदया । असेल तैसी वदूनियां । सुखालागीं हेलावें ॥

#### Transliteration

**Yeree mhane Poorvada-raayaa | Artha-kaamana kona hridayaa | Asela taisee vaduni-yaa | Sukhaa-laagee helaave ||**

### Ovee 56

येरु म्हणे वो शुभाननी । विषयधनाची बोलसी कडसणी । परी कांहीं कामना नसे मनीं । अज्ञान असे या अर्थी ॥

#### Transliteration

**Yeru mhane vo shubha-aananee | Vishaya-dhanaachee bolasee kadasanee | Paree kaanhee kaamanaa nase manee | Ajnyaana ase yaa arthee ||**

## Ovee 57

एक वेळ उदरापुरती । समया देईं कां आहुती । याविरहित अर्थ चित्तीं । इच्छा नसे कांहींच ॥

### Transliteration

**Eka vela udaraa-pura-tee | Samayaa deee kaa aahutee | Yaa-virahita artha chittee | Ichchaa nase kaanheenchu ||**

## Ovee 58

येरी ऐकूनि ऐसें वचन । अवश्य करी प्रेमें भाषण । म्हणे महाराजा नरेंद्रा पूर्ण । अर्थ पुरेल हा तुमचा ॥

### Transliteration

**Yeree aikuni aise vachanu | Avashya caree preme bhaashanu | Mhane Mahaaraajaa narendraa poornu | Artha purela haa tumachaa ||**

## Ovee 59

परी एक आहे मम बोलणें । स्त्रीराज्यांत आपण जाणें । तेथें पुरुषाचें आगमन । नाहींच त्या देशांत ॥

### Transliteration

**Paree eka ahe mama bolane | Stree-raajyaanta aapana jaane | Tethe purushaache aagamanu | Naaheencha tyaa deshaantu ||**

## Ovee 60

येरु म्हणे कवण अर्थी । आगमन नसे तया देशाप्रती । yeरी म्हणे मारुतसुती । भुभुःकारें स्त्रिया होती ॥

### Transliteration

**Yeru mhane kavana arthee | Agamana nase tayaa deshaapratee | Yeree mhane Maaruta-sutee | Bhubhuh-kaare striyaa hotee ||**

## Ovee 61

ऊर्ध्वरेता वायुनंदन । रेत पडे भुभुःकारवचनें । गरोदर होती तेणेंकरुन । सकळ स्त्रिया त्या देशीं ॥

### Transliteration

**Oordhvaretaa Vaayu-nandanu | Reta pade bhubhuhkaara-vachene | Garodara hotee tenenkarunu | Sakala striyaa tyaa deshee ||**

## Ovee 62

त्याचि भुभुःकारेंकरुन । पुरुषगर्भांत होय पतन । तेणेंकरुन तयांसी मरण । होतसे जाण महाराजा ॥

### Transliteration

**Tyaachi bhubhuhkaaren-karunu | Purusha-garbhaanta hoya patanu | Tenenkaruna tayaansee maranu | Hotase jaana Mahaaraajaa ||**

## Ovee 63

तरी तुझें जाणें उदेलें चित्तीं । परी तूंतें होईल कैसी गती । या संशयाची भ्रांती । मनीं घोटाळे माझिया ॥

### Transliteration

**Taree tujhe jaane udele chittee | Paree toote hoeela kaisee gatee | Yaa sanshayaachee bhraantee | Manee ghotaale maajhiyaa ||**

## Ovee 64

येरु म्हणे ऐक युवती । काय करील आम्हा मारुती । प्रळयकाळींची मूर्ध्नी हरती । लोळवीन महीतें ॥

### Transliteration

**Yeru mhane aika yuvatee | Kaaya kareela aamhaa Maarutee | Pralaya-kaaleenchee moordhnee haratee | Lolaveena maheete ||**

## Ovee 65

असे तीव्रपणाचा तपोजेठी । जेणें सविता गिळोनि ठेविला पोटीं । तेथें दीपाची हळहळ मोठी । मानील काय तो पुरुष ॥

### Transliteration

**Ase teevra-panaachaa tapo-jethee | Jene Savitaa giloni thevilaa potee | Tethe deepaachee halahala mothee | Maaneela kaaya toh purushu ||**

## Ovee 66

सकळ मही जो माथां वाहे । त्यातें पर्वताचें भय काये । अंब्धी गिळितां शरण रिघावें । काय वेगें थिल्लर ॥

### Transliteration

**Sakala mahee jo mathaa vahe | Tyaate parvataache bhaya kaaye | Ambdhee gilitaa sharana righaave | Kaaya vege thillaru ||**

## Ovee 67

तरी आता शुभाननी । हा संशय तूं न आणीं मनीं । ऐसें गोरक्ष तीतें बोलोनी । ते स्थानाहूनि उठिला ॥

### Transliteration

**Taree aataa shubha-aananee | Haa sanshaya too na aanee manee | Aise Goraksha teete bolonee | Tey sthaanaa-huni uthilaa ||**

## Ovee 68

मग ती कलिंगा बैसवूनि रथीं । आपण झाला पुढें सारथी । दोन्ही वाग्दोरे धरुनि हातीं । धुरा वेष्टुनिया बैसलासे ॥

### Transliteration

**Maga tee Kalingaa baisavuni rathee | Aapana jhaalaa pude saarathee | Donhee vaagdore dharuni hateee | Dhuraa veshtuniyaa baisalaase ||**

## Ovee 69

परी प्रथमारंभी तो धूर्जटी । करीं कवळूनि भस्मचिमुटी । वज्रास्त्र मंत्रहोटीं । अपारशक्ती जल्पला ॥

### Transliteration

**Paree prathama-arambhee toh Dhoorjatee | Karee kavaluni bhasma-chimutee | Vajra-astra mantra-hotee | Apaara-shaktee jalpalaa ||**

## Ovee 70

तयामागें स्पर्शमंत्रा । जल्पोनियां निजवक्रा । तेंहीं मिरवे सबळ अस्त्रा । महीलागीं महाराजा ॥

### Transliteration

**Tayaa-maage sparsha-mantraa | Jalponiyaa nijavakraa | Tehee mirave sabala astraa | Mahee-laagee Mahaaraajaa ||**

## Ovee 71

यावरी तिसरें मोहनास्त्र । विराजले अति पवित्र । उपरी चवथें नागास्त्र । सीमेवरी तें प्रेरिलें ॥

### Transliteration

**Yavaree tisare mohana-astru | Viraajale ati pavitru | Uparee chavathe naaga-astru | Seemevaree tey prerile ||**

## Ovee 72

ऐसें चतुर्थास्त्र प्रेरुन । चालता झाला गोरक्ष त्वरेनें । सीमा उल्लंघूनि एक योजन । स्त्रीदेशांत मिसळला ॥

### Transliteration

**Aise chaturtha-astra prerunu | Chaalataa jhaalaa Goraksha tvarene | Seemaa ullanghuni eka yojanu | Stree-deshaanta misalalaa ||**

## Ovee 73

चिनापट्टण उत्तम ग्राम । तेथें झालासे मुक्काम । तंव लोटूनि गेला अवघा दिन । महीं निशा दाटली ॥

### Transliteration

**Chinaa-pattana uttama graamu | Tethe jhaalaase mukkaamu | Tava lotuni gelaa avaghaa dinu | Mahee nishaa daatalee ||**

## Ovee 74

परी दिनासमान रात्री । चंद्रतेजें मिरवली होती । सकळीं भोजनें सारुनि निगुतीं । पहुडलीं शयनीं आपुलाल्या ॥

### Transliteration

**Paree dinaa-samaana raatree | Chandra-teje miravalee hotee | Sakalee bhojane saaruni nigutee | Pahudalee shayanee apulaalyaa ||**

## Ovee 75

निशा लोटली एक प्रहर । तों रात्री निवळली महीवर । सकळ लोपूनि अंधकार । दिशा उजेडें उजळली ॥

### Transliteration

**Nishaa lotalee eka praharu | Toh raatree nivalalee maheevaru | Sakala lopuni andha-kaaru | Dishaa ujede ujalalee ||**

## Ovee 76

ते दिनींची म्हणूं नये रात्री । की उदया आली माया भगवती । चंद्रपोत घेऊनि हातीं । सहजमतीं क्रीडतसे ॥

### Transliteration

**Tey dineenchee mhanoo naye raatree | Kee udayaa aalee maayaa bhagavatee | Chandra-pota gheuni haatee | Sahaja-matee kreedatase ||**

## Ovee 77

कीं ते रात्र नव्हे जडितपदक । हेमतगटी अवनी देख । त्यावरी नक्षत्रें अन्य माणिक । मध्यें हिराबिंदुशोभे जैसा ॥

### Transliteration

**Kee tey raatra nvhe jadita-padaku | Hema-tagatee avanee dekhu | Tyaa-varee nakshatre anya maaniku | Madhye hiraa-bindu-shobhe jaisaa ||**

## Ovee 78

कीं ते रात्र नव्हे भद्रकाळी । श्रृंगारनक्षत्रें मुक्तमाळी । चंद्रबिजवरा लेवूनि भाळीं । महीलागीं क्रीडतसे ॥

### Transliteration

**Kee tey raatra nvhe Bhadra-kaalee | Shrringaara-nakshatre mukta-maaleee | Chandra-bijavaraa levuni bhaaleee | Mahee-laagee kreedatase ||**

## Ovee 79

ऐसियेपरी सुलक्षण राती । उजेड दावी महीवरती । तों येरीकडे गमन मारुती । सेतुहूनि करीतसे ॥

### Transliteration

**Aisiye-paree su-lakshana raatee | Ujeda davee mahee-varatee | Toh yereekade gamana Maarutee | Setuhuni kareetase ||**

## Ovee 80

मार्गीं जातां सहजस्थितीं । yeवोनि पोंचला सीमेवरती । तों वज्रास्त्र हृदयाप्रती । yeवोनियां आदळलें ॥

### Transliteration

**Maargee jaataa sahaja-shitee | Yevoni ponchalaa seemeva-ratee | Toh Vajra-astra hridayaa-pratee | Yevoniyaa aadalale ||**

## Ovee 81

वज्रशरीरी मारुती । परी वज्रप्रहारें पडला क्षितीं । मूर्च्छा दाटोनि हृदयाप्रती । विगतगति पडलासे ॥

### Transliteration

**Vajra-shareeree Maarutee | Paree Vajra-prahaare padalaa kshitee | Moorchchaa daatoni hridayaa-pratee | Vigatagati padalaase ||**

## Ovee 82

यावरी स्पर्श करी झगटीं । लिप्त केला महीपाठीं । त्यावरी मोहनास्त्र हृदयपुटीं । जाऊनियां संचरलें ॥

### Transliteration

**Yavaree sparsha karee jhagatee | Lipta kelaa mahee-paathee | Tyaa-varee mohana-astra hridaya-putee | Jauniyaa sancharale ||**

## Ovee 83

त्यावरी नागास्त्र नागपती । सहस्त्रफणी प्रत्यक्षमूर्ती । उदय पावतां पदहस्ती गुंडाळूनियां बैसला ॥

### Transliteration

**Tyaa-varee Naaga-astra naaga-patee | Sahastra-phanee pratyaksha-moortee | Udaya paavataa pada-hastee gundaa-luniyaa baisalaa ||**

## Ovee 84

चतुर्थास्त्रांचे पडता वेष्टन । मग कासावीस होतसे वायुनंदन । अति तळमळे उडयाकारण । परी स्पर्शास्त्र उठों नेदी ॥

### Transliteration

**Chaturtha-astraanche padataa veshtanu | Maga kaasaaveesa hotase Vaayu-nandanu | Ati talamale udayaa-kaaranu | Paree sparsha (teja)-astra utho nedee ||**

## Ovee 85

घडोघडी मूर्च्छा येतां । नेत्र भोवंडी वांती देतां । त्यावरी विखार वेष्टितां । तेणें होत कासाविसी ॥

### Transliteration

**Ghado-ghadee moorchchaa yetaa | Netra bhovandee vaantee detaa | Tyaa-varee vikhaara veshtitaa | Tene hota kaasaavisee ||**

## Ovee 86

मोहनास्त्राचा अति प्रसर । मोहूनि घेतलें सकळ शरीर । मी कोण कोणत्या कार्यांवर । आलों हेंही कळेना ॥

### Transliteration

**Mohana-astraachaa ati prasaru | Mohuni ghetale sakala shareeru | Mee kona konatyaa kaaryaa-varu | Aalo henhee kalenaa ||**

## Ovee 87

ऐसा निचेष्टित महीवरती । पडला असे मारुती । एक प्रहर लोटल्यावरती । प्राण निघूं पाहातसे ॥

### Transliteration

**Aisaa nicheshtita mahee-varatee | Padalaa ase Maarutee | Eka prahara lotalyaa-varatee | Praana nighoo paahaatase ||**

## Ovee 88

नेत्र झाले श्वेतवर्णी । मुखीं लोटलें आरक्त पाणी । तें लोटलें सकळ अवनीं । भिजूनि लोट लोटतसे ॥

### Transliteration

**Netra jhaale swetavarnee | Mukhee lotale aarakta paanee | Tey lotale sakala avanee | Bhijuni lota lotatase ||**

## Ovee 89

aisa समय तया होतां । मग विचार करी आपुल्या चित्ता । ऐसिया संकटीं प्राण आतां । वांचत नाहीं सहसाही ॥

### Transliteration

**Aisaa samaya tayaa hotaa | Maga vichaara karee aapulyaa chittaa | Aisiyaa sankatee praana aataa | Vaanchata naahee sahasaahee ||**

## Ovee 90

तरी माझा काळ आला । आतां स्मरावें श्रीरामाला । ऐसा विचार करुनि स्वचित्ताला । आठविलें श्रीरामातें ॥

### Transliteration

**Taree maajhaa kaala aalaa | Aataa smaraave Shree-Raamaalaa | Aisaa vichaara karuni sva-chittaalaa | Aathavile Shree-Raamaate ||**

## Ovee 91

हे दयार्णवा कुळभूषणा । सीतापते रघुनंदना । दशग्रीवांतका भक्तदु:खमोचना । धांव पाव वेगेंसीं ॥

### Transliteration

**Hey dayaarnavaa kula-bhooshanaa | Seetaa-pate Raghu-nandanaa | Dashagreeva-antakaa bhakta-duhkha-mochanaa | Dhaava pava vegensee ||**

## Ovee 92

हे करुणानिधे ताटिकांतका । मुनिमनोरंजना रघुकुळटिळका । अयोध्याधीशा प्रतापार्का । धांव पाव वेगेंसीं ॥

### Transliteration

**Hey karunaa-nidhe Taatikaa-antakaa | Muni-manoranjanaa Raghu-kula-tilakaa | Ayodhyaa-adheeshaa prataapa-arkaa | Dhaava pava vegensee ||**

## Ovee 93

हे शिवमानसरंजना । चापधारका तापहरणा । शरयूतीर विहारा आनंदसदना । धांव पाव वेगेंसीं ॥

#### Transliteration

**Hey Shiva-maanasa-ranjanaa | Chaapa-dhaarakaa taapa-haranaa | Sharayoo-teera vihaaraa aananda-sadanaa | Dhaava pava vegensee ||**

## Ovee 94

हे श्रीरामा श्यामतनुधारका । एकवचनी व्रतदायका । एकपत्नीबाणनायका । धांव पाव वेगेंसीं ॥

#### Transliteration

**Hey Shree-Raamaa shyama-tanu-dhaarakaa | Eka-vachanee vratadaayakaa | Eka-patnee-baana-naayakaa | Dhaava pava vegensee ||**

## Ovee 95

हे पंकजनेत्रा कोमलगात्रा । बिभीषणप्रिया कोमलपात्रा । परमप्रिय कपिकुळगोत्रा । धांव पाव वेगेंसीं ॥

#### Transliteration

**Hey pankaja-netraa komala-gatraa | Bibheeshana-priyaa komala-paatraa | Parama-priya kapi-kula-gotraa | Dhaava pava vegensee ||**

## Ovee 96

हे किष्किंधाधिपवालिनिर्दलना । भक्तप्रियकरा भयमोचना । विदेहजामाता जगपाळणा । धांव पाव वेगेंसीं ॥

#### Transliteration

**Hey kishkindhaa-adhipa-vaali-nirdalanaa | Bhakta-priyakaraa bhaya-mochanaa | Videha-jaamaataa jaga-paalana || Dhaava pava vegensee ||**

## Ovee 97

हे विश्वामित्रमखसिद्धिकारका । खरदुषेणादिदैत्यांतका । जलधिजलपाषाणतारका । धांव पाव वेगेंसीं ॥

#### Transliteration

**Hey Vishvaamitra-makha-siddhi-kaarakaa | Kharadushenaa-di-daitya-antakaa | Jaladhi-jala-paashaana-taarakaa | Dhaava pava vegensee ||**

## Ovee 98

हे अहिमहिदानवहरिता । शतमुखखंड वैदेहीरता । मंगळधारणा कुशळवंता । धांव पाव वेगेंसीं ॥

#### Transliteration

**Hey Ahi-mahi-daanava-haritaa | Shatamukha-khanda Vaideehee-rataa | Mangala-dhaaranaa kushala-vantaa | Dhaava pava vegensee ||**

### Ovee 99

हे अर्णवविहारी मारीचदमना । जटायूप्रिया मोक्षगहना । शिवचापभंगा मंगळधामा । धांव पाव वेगेंसीं ॥

**Transliteration**

**Hey arnava-vihaaree Maareecha-damanaa | Jataayoo-priyaa moksha-gahanaa | Shiva-chaapa-bhangaa mangala-dhaamaa | Dhaava pava vegensee ||**

### Ovee 100

हे दयार्णव राम करुणाकरु । मित्रकुळध्वज कीर्तिधारु । ऐसें असूनि संकटपारु । सुखशयनीं निजला अससी ॥

**Transliteration**

**Hey dayaarnava Raama karunaakaru | Mitra-kula-dhvaja keerti-dhaaru | Aise asuni sankata-paaru | Sukha-shayanee nijalaa asasee ||**

### Ovee 101

तरी आतां धांव वेगीं । तव दूत या संकटप्रसंगीं । मुक्त होऊं दे महीलागीं । शरणागततारक तूं म्हणवितोसी ॥

**Transliteration**

**Taree aataa dhaava vegee | Tava doota yaa sankata-prasangee | Mukta hooo de mahee-laagee | Sharanaagata-taaraka too mhanavitosee ||**

### Ovee 102

ऐसी स्तुति वागुत्तर । करीत अति वायुकुमार । ते वाग्बाण श्रवणद्वार । रिघते झाले रामाचें ॥

**Transliteration**

**Aisee stuti vaag-uttaru | Kareeta ati Vaayu-Kumaaru | Tey vaag-baana shravana-dvaaru | Righate jhaale Raamaache ||**

### Ovee 103

जाणूनि परम संकटमात । धांवोनि आला श्रीरघुनाथ । मारुतीचें संकट पाहूनि अत्यंत । परम चित्तीं कळवळला ॥

**Transliteration**

**Jaanuni parama sankata-maatu | Dhaavoni aalaa Shree-Raghunaathu | Maarutee-che sankata pahuni atyantu | Parama chittee kalavalalaa ||**

### Ovee 104

कीं एकांत पाडसावांचूनि हरिणी । हिंडे सैरावैरां रानीं । तन्न्यायें मोक्षदानी । हृदयामाजी कळवळला ॥

**Transliteration**

**Kee ekaanta paadasaa-vaanchuni harinee | Hinde sairaa-vairaa raanee | Tan-nyaaye Mokshadaanee | Hridayaa-maajee kalavalalaa ||**

### Ovee 105

जैसी वत्सालागीं गाय । काननी हंबरडा फोडी मोहें । त्याचिप्रमाणें रघुराय । हृदयामाजी कळवळला ॥

#### Transliteration

**Jaisee vatsaa-laagee gaayu | Kaananee hambaradaa phodee | Mohe tyaachi-pramaane Raghuraayu | Hridayaa-maajee kalavalalaa ||**

### Ovee 106

जळवेगळां पडतां मीन । अति तळमळोनि सोडी प्राण । तन्न्यायें रघुनंदन । हृदयामाजी कळवळला ॥

#### Transliteration

**Jala-vegalaan padataa meenu | Ati talamaloni sodee praanu | Tan-nyaaye Raghu-nandanu | Hridayaa-maajee kalavalalaa ||**

### Ovee 107

किंवा बाळ मातेचे चुकार होतां । आरंबळती तीं उभयतां । तन्न्यायें भक्त निःशक्त होतां । हृदयामाजी कळवळला ॥

#### Transliteration

**Keevaa baala maateche chukaara hotaa | Aarambalatee tee ubhayataa | Tan-nyaaye bhakta nihshakta hotaa | Hridayaa-maajee kalavalalaa ||**

### Ovee 108

मग मनोवेगातें मागें सारुन । प्रत्यक्ष आला लगबगें धांवून । तों विकळ होऊनि भक्तजन । अहा अहा म्हणतसे ॥

#### Transliteration

**Maga mano-vegaate maage saarunu | Pratyaksha aalaa lagabage dhaavunu | Toh vikala houni bhakta-janu | Ahaa ahaa mhanatase ||**

### Ovee 109

मग तापनिवारण चाप करीं । शर संजुनि बाप कैवारी । पाकशासनास्त्र अवधारी । वज्रास्त्र निवटाया ॥

#### Transliteration

**Maga taapa-nivaarana chaapa karee | Shara sanjuni baapa kaivaaree | Paaka-shaasana-astru avadhaaree | Vajra-astra nivataayaa ||**

### Ovee 110

प्रेरितांचि पाकशासनास्त्र । प्रकट झाला सहस्त्रनेत्र । वज्रास्त्र कवळूनि पवित्र । जाता झाला अमरपुरीं ॥

#### Transliteration

**Preritaanchi Paaka-shaasana-astru | Prakata jhaalaa sahastra-netru | Vajra-astra kavaluni pavitru | Jaataa jhaalaa amarapuree ||**

## Ovee 111

यावरी विभक्तास्त्र जल्पून । स्पर्शास्त्र केलें निवारण । यावरी फणी सहस्त्रनयन । हस्तपदीं गुंडाळला ॥

### Transliteration

**Yavaree vibhakta-astra jalpunu | Sparsha-astra kele nivaaranu | Yavaree phanee sahastra-nayanu | Hasta-padee gundaalalaa ||**

## Ovee 112

तयासाठीं क्षीराब्धिवासी । लक्ष्मीनारायण वेगेंसीं । तें प्रत्यक्षस्वरुपें उरगेंसीं । पाहता वैनतेय झालासे ॥

### Transliteration

**Tayaa-saathee ksheera-abdhi-vaasee | Lakshmee-Naaraayana vegensee | Tey pratyaksha-svarupe uragensee | Paahataa Vainateya jhaalaase ||**

## Ovee 113

नमूनि म्हणे अहा अनंता । तूं प्रिय अससी माझे चित्ता । याचि नीतीं वायुसुता । संबोखीत आहेसी ॥

### Transliteration

**Namuni mhane ahaa anantaa | Too priya asasee maajhe chittaa | Yaachi neetee Vaayu-sutaa | Sambokheeta aahesee ||**

## Ovee 114

तरी आतां मम सखया । मुक्त करीं अंजनीहृदया । ऐसें ऐकोनि आराधिया । मोहाब्धि उचंबळला ॥

### Transliteration

**Taree aataa mama sakhayaa | Mukta karee Anjanee-hridayaa | Aise aikoni aaraadhiyaa | Mohaabdhi uchambalalaa ||**

## Ovee 115

मग स्वदेहपुच्छ काढूनि । मुक्त केलें हस्तचरण । काढूनि घेतलें अस्त्रमोहन । प्रत्यक्ष विष्णु होऊनियां ॥

### Transliteration

**Maga svadeha-puchchha kaadhunu | Mukta kele hasta-charanu | Kaadhuni ghetale astra-mohanu | Pratyaksha Vishnu houniyaa ||**

## Ovee 116

असो नागास्त्री उरगपती । प्रेमें नमूनि अब्धिजापती । जाता झाला स्वस्थानाप्रती । मही धारण करावया ॥

### Transliteration

**Aso Naaga-astree uraga-patee | Preme namuni abdhi-ja-patee | Jaataa jhaalaa svasthaanaa-pratee | Mahee dhaarana karaavayaa ||**

## Ovee 117

येरीकडे अंजनीनंदन । सावध होऊनि बैसला जाण । हृदयीं आठवूनि रामगुण । स्वस्थ झाला तेधवां ॥

### Transliteration

**Yereekade Anjaneenandanu | Saavadha houni baisalaa jaanu | Hridayee aathavuni Raama-gunu | Svastha jhaalaa tedhavaa ||**

## Ovee 118

दृष्टीं करितां चहुंकडे । तो रामस्वामी देखिला पुढें । आनंदोनि मग प्रेमें उडे । चरणकमल नमावया ॥

### Transliteration

**Drishtee karitaa chahunkade | Toh Raama-svaamee dekhilaa pudhe | Aanandoni maga preme ude | Charana-kamala namaavayaa ||**

## Ovee 119

वंदूनि श्रीरामाचे चरण । म्हणे महाराजा वांचविला प्राण । वेधलें अस्त्र अति दुर्गम । देखिलें नाहीं कधीं हो ॥

### Transliteration

**Vanduni Shree-Raamaa-che charanu | Mhane Mahaaraajaa vaanchavilaa praanu | Vedhale astra ati durgamu | Dekhile naahee kadhee ho ||**

## Ovee 120

अस्त्र नव्हे परम काळ । महाप्रळयींचें उतालें सबळ । आणि माझा अंतकाळ । ओढवला होतां महाराजा ॥

### Transliteration

**Astra navhe parama kaalu | Mahaa-pralayeenche utaale sabalu | Aani (aaji) maajhaa anta-kaalu | Odhavalaa hotaa Mahaaraajaa ||**

## Ovee 121

परी तूं माझी माय सघन । लगबगीनें आलीस धांवून । म्हणूनि वांचला माझा प्राण । प्रळयास्त्रामाझारीं ॥

### Transliteration

**Paree too maajhee Maaya saghanu | Lagabageene aaleesa dhaavunu | Mhanuni vaanchalaa maajhaa praanu | Pralaya-astraa-maajhaaree ||**

## Ovee 122

तरी तुझिया उपकारा । उत्तीर्णता न होय मज पामरा । ऐसें वदोनि वागुत्तरा । चरणांवरी लोळतसे ॥

### Transliteration

**Taree tujhiyaa upakaaraa | Utteernataa na hoya maja paamaraa | Aise vadoni vaaguttaraa | Charanaam-varee lolatase ||**

## Ovee 123

अति कनवाळू सीतापती । सप्रेम हृदयीं धरिला मारुती । म्हणे तुजसाठीं बा या क्षिती । तीन वेळां आलों मी ॥

### Transliteration

**Ati kanavaaloo Seetaa-patee | Saprema hridayee dharilaa Marutee | Mhane tuja-saathee baa yaa kshitee | Teena velaa aalo mee ||**

## Ovee 124

तेव्हां चतुर्थ अस्त्रबंधन । मुक्त झालें तुजकारण । परी असो तव शत्रु कोण । वेगें वद मम वत्सा ॥

### Transliteration

**Tevhaa chaturtha astra-bandhanu | Mukta jhaale tuja-kaaranu | Paree aso tava shatru konu | Vege vada mama vatsaa ||**

## Ovee 125

येरु म्हणे महाराजा । अकल्पित लाभ संकटचोजा । शत्रु येथें कवण माझा । प्राप्त झाला असे कीं ॥

### Transliteration

**Yeru mhane Mahaaraajaa | Akalpita laabha sankata-chojaa | Shatru yethe kavana maajhaa | Praapta jhaalaa ase kee ||**

## Ovee 126

तरी आतां प्रस्तुतकाळीं । क्षत्रिय नसे कोणी बळी । परी नाथपंथी अस्त्रफळीं । मिरवीतसे महाराजा ॥

### Transliteration

**Taree aataa prastuta-kaalee | Kshatriya nase  konee Balee | Paree Naatha-panthee astra-phalee | Miraveetase Mahaaraajaa ||**

## Ovee 127

तरी महाराजा नवांतील एक । आला असे प्रतापदायक । तयाचा प्रताप जो अर्क । असे अजिंक्य सर्वांसी ॥

### Transliteration

**Taree Mahaaraajaa navaan-teela eku | Aalaa ase prataapa-daayaku | Tayaachaa prataapa jo Arku | Ase ajinkya sarvaansee ||**

## Ovee 128

ऐसें ऐकूनि मारुतीवचन । म्हणे राम नाथपंथी भक्त जाण । तयांसी रळी हे वायुनंदन । करुं नये सहसाही ॥

### Transliteration

**Aise aikuni Marutee-vachanu | Mhane Raama Naatha-panthee bhakta jaanu | Tayaansee ralee hey Vaayu-nandanu | Karu naye sahasaahee ||**

### Ovee 129

ते भक्त माझे आवडीचे असती । तयांसीं रळी न करीं मारुती । आपण आपुल्या विक्षेपवृत्ती । वाढवूं नये सर्वज्ञा ॥

#### Transliteration

**Tey bhakta maajhe aavadeeche asatee | Tayaansee ralee na karee Marutee | Aapana aapulyaa vikshepa-vrittee | Vaadhavoo naye sarvajnyaa ||**

### Ovee 130

ऐसी नीति रघुवीर । अंजनीसुता बोलोनि उत्तर । हृदयांत पाहे जनकजावर । नाथ कोणता नवांतुनी ॥

#### Transliteration

**Aisee neeti Raghu-veeru | Anjanee-sutaa boloni uttaru | Hridaya-anta paahe janaka-ja-varu | Naatha konataa navaantunee ||**

### Ovee 131

तों सहज दृष्टीं अंतरीं करितां । चित्त गुंतले गोरखसुता । मग मारुतीसी म्हणे वो प्रतापवंता । गोरक्षनाथ असे हा ॥

#### Transliteration

**Toh sahaja drishtee antaree karitaa| Chitta guntale Gorakha-sutaa | Maga Maruteesee mhane vo prataapa-vantaa | Goraksha-Naatha ase haa ||**

### Ovee 132

असो जो हरिनारायण । तयाचा अवतार गोरक्ष जाण । याउपरी बोले मारुती वचन । चला जाऊं दर्शना तयाच्या ॥

#### Transliteration

**Aso jo Hari-Naaraayanu | Tayaachaa avataara Goraksha jaanu | Yaa-uparee bole Marutee vachanu | Chalaa jaaoo darshanaa tayaa-chyaa ||**

### Ovee 133

या सीमेपासूनि एक योजन । तेणें रचुनि हें संधान । प्रतापी आहे गौरनंदन । स्त्रीराज्यांत जाते झाले ॥

#### Transliteration

**Yaa seeme-paasuni eka yojanu | Tene rachuni hey sandhaanu | Prataapee aahe gaura-nandanu | Stree-raajyaanta jaate jhaale ||**

### Ovee 134

तया नाथाची घेतां भेटी । एक अर्थ आहे आमुचे पोटीं । तो साधूनि घेऊनि त्यांत शेवटीं । तरी कृपाजेठी चलावें ॥

#### Transliteration

**Tayaa Naatha-achee ghetaa bhetee | Eka artha aahe aamuche potee | Toh saadhuni gheuni tyaanta shevatee | Taree kripaa-jethee chalaave ||**

## Ovee 135

राम म्हणे वो अर्थ कोण । तो मातें करी निवेदन । मग सकळ कथा अंजनीनंदन । मच्छिंद्राची वदलासे ॥

### Transliteration

**Raama mhane vo artha konu | Toh maate karee nivedanu | Maga sakala kathaa Anjanee-nandanu | Machchindra-achee vadalaase ||**

## Ovee 136

मैनाकिनीचें तपोवचन । मच्छिंद्र पाठविला म्हणून । तरी गोरक्षक आतां जाऊन । घेऊन येईल मच्छिंद्रा ॥

### Transliteration

**Meinaa-kineeche tapovachanu | Machchindra paathavilaa mhanunu | Taree Gorakshaka aataa jaunu | Yaeela gheuna Machchindraa ||**

## Ovee 137

तरी त्यासी अमृतवाणी । बोलूनि गोंवावा दृढवचनीं । मग तो गोरक्ष मच्छिंद्र लागूनि । नेणार नाहीं कदाही ॥

### Transliteration

**Taree tyaasee amrita-vaanee | Boluni govaavaa dridha-charaanee | Maga toh Goraksha Machchindra laguni | Nenaara naahee kadaahee ||**

## Ovee 138

ऐसा विचार सुचवी रामातें । बोलता झाला सीतानाथ । म्हणे बा तुझा पुरवावया अर्थ । चाल गोरक्षा भेटाचया ॥

### Transliteration

**Aisaa vichaara suchavee Raamaate | Maga bolataa jhaalaa Seetaa-Naathu | Mhane baa tujhaa puravaavayaa arthu | Chaala Gorakshaa bhetaachayaa ||**

## Ovee 139

युक्तीप्रयुक्ती बोलूनि वचन । परमादरें तोषवून । इतुका अर्थ घेऊं मागून । तुजसाठीं कपींद्रा ॥

### Transliteration

**Yuktee-prayuktee boluni vachanu | Paramaadare toshavunu | Itukaa artha gheoo magunu | Tuja-saathee kapeendraa ||**

## Ovee 140

ऐसें वडूनि रघुनाथ । मग चालते झाले उभयतां । मध्यरात्रीचा समय होतां । चिनापट्टण ग्राम पोंचलें ॥

### Transliteration

**Aise vaduni Raghu-Naathu | Maga chaalate jhaale ubhayataa | Madhya-raatreechaa samaya hotaa | Chinaa-pattana graama ponchale ||**

## Ovee 141

तंव त्या ग्रामीं सुख शयनीं । पहुडले होते सुखपणीं । स्वस्वरुपीं अन्तःकरणीं । हेलावतसे ब्रह्मांड ॥

### Transliteration

**Tanva tyaa graamee sukha shayanee | Pahudale hote sukha-panee | Sva-sva-rupee antahkaranee | Helaa-vatase Brahmaandu ||**

## Ovee 142

येरीकडे रघुनाथ । आणि द्वितीय अंजनीसुत । ग्रामानिकट येतां त्वरित । स्वरुपातें पालटिती ॥

### Transliteration

**Yereekade Raghu-Naathu | Aani dviteeya Anjaneesutu | Graamaa-nikata yetaa tvaritu | Svarupaate paalatitee ||**

## Ovee 143

शुद्ध करुनि याचकपण । भावे आले उत्तम ब्राह्मण । नमन करितां गौरनंदन । तया ठायीं पातले ॥

### Transliteration

**Shuddha karuni yaachaka-panu | Bhaave aale uttama braahmanu | Namana karitaa gaura-nandanu | Tayaa thaayee paatale ||**

## Ovee 144

तंव तो साधक गोरक्षनाथ । बैसला होतां निवांत । वाचे अंशघन सद्गुरुनाथ । प्रेमछंदे डुल्लतसे ॥

### Transliteration

**Tanva toh saadhaka Goraksha-Naathu | Baisalaa hotaa nivaantu | Vache anshaghana Sadguru-Naathu | Premachande dullatase ||**

## Ovee 145

जैसा जळामाजी मीन । तळपत आहे स्वछंदेंकरुन । तन्न्यायें गोरक्षनंदन । श्रीगुरुभजनीं डोलतसे ॥

### Transliteration

**Jaisaa jalaamaajee meenu | Talapata aahe svachan-denkarunu | Tan-nyaaye Goraksha-nandanu | Shree-guru-bhajanee dolatase ||**

## Ovee 146

तों येरीकडे उभयतां । प्रत्यक्ष जाऊनि तेथ । आदेश म्हणून वंदिला नाथ । निकट जाऊनि बैसले ॥

### Transliteration

**Toh ye-ree-kade ubhayataa | Pratyaksha jauni tethu | Aadesha mhanuna vandilaa Naathu | Nikata jauni baisale ||**

## Ovee 147

बोलती बैसतांचि वचन । आम्हीं षड्शास्त्री ब्राह्मण । तुम्हीं नाथ परिपूर्ण । महीवरी असतां कीं ॥

### Transliteration

**Bolatee baisataanchi vachanu | Aamhee shad-shaastree braahmanu | Tumhee Naatha paripoornu | Maheevaree asataa kee ||**

## Ovee 148

योगियांमाजी शिरोमणी । जितेन्द्रिय सदा दमनी । विरक्तांत पूर्णपणीं । मिरविसी महाराज ॥

### Transliteration

**Yogiyaam-maajee shiromanee | Jitendriya sadaa damanee | Virakta-anta poorna-panee | Miravisee Mahaaraaju ||**

## Ovee 149

धैर्याब्धीचें बुद्धिजळ । मिरविसी विवेकपात्रीं सबळ । परघात तो वडवानळ । शांतोदरीं सांठवीसी ॥

### Transliteration

**Dhairya-abdheeche buddhi-jalu | Miravisee viveka-paatree sabalu | Paraghaata toh vadavaa-analu | Shaanto-daree saanthaveesee ||**

## Ovee 150

मित्रशत्रुद्वितीयतटीं । सदैव कृपांसरितेचा पूर लोटी । क्षेमालिंगन अर्थी भेटी । वर्तविली महाराजा ॥

### Transliteration

**Mitrashatru-dviteeyatatee | Sadaiva kripaan-saritechaa poora lotee | Kshemaa-lingana arthee bhetee | Vartavilee Mahaaraajaa ||**

## Ovee 151

तरी सच्चिदानंद तेजाकारु । कीं वहनादि चराचरु । एक पहाणें जंगमादरु । दाटविसी महाराजा ॥

### Transliteration

**Taree sachchidaananda tejaa-kaaru | Kee vahanaadi charaa-charu | Eka pahaane jangamaadaru | Daatavisee Mahaaraajaa ||**

## Ovee 152

तूं ऐसा औदार्यदाता । अपूर्ण मिरविसी धनवंता । तरी महाराजा आमुच्या अर्था । साधिला तो पुरवीं कां ॥

### Transliteration

**Too aisaa audaarya-daataa | Apoorna miravisee dhanavantaa | Taree Mahaaraajaa aamuchyaa arthaa | Sadhilaa toh puravee kaa ||**

## Ovee 153

गोरक्ष म्हणे विप्रोत्तमा । कोण कामना वेधली तुम्हां । तरी सरिता कार्यउगमा । प्रसिद्धपर्णी मिरवावें ॥

### Transliteration

**Goraksha mhane viprottamaa | Kona kaamanaa vedhalee tumhaa | Taree saritaa kaarya-ugamaa | Prasiddha-panee miravaave ||**

## Ovee 154

येरु म्हणती जी योगशीला । वरदपात्री ओपूं बोला । मग आमुची सरिता विपुला । आनंद जळीं दाटेल ॥

### Transliteration

**Yeru mhanatee jee yoga-sheelaa | Varada-paatree opoo bolaa | Maga aamuchee saritaa vipulaa | Aananda jalee daatelu ||**

## Ovee 155

तरी भाष देऊनि आतां । toषवी कां आमुचे चित्ता । भाष्यदिधल्यावरी अर्था । दर्शवूं तूतें महाराजा ॥

### Transliteration

**Taree bhaasha deuni aataa | Toshavee kaa aamuche chittaa | Bhaashya-didhalyaa-varee arthaa | Darshavoo toote Mahaaraajaa ||**

## Ovee 156

ऐसी ऐकोनि तयांची वाणी । तो गोरक्ष विचार करी मनीं । कीं इतुका गौप्यार्थ मेदिनी । कोण आहे मजपाशी ॥

### Transliteration

**Aisee aikoni tayaanchee vaanee | Toh Goraksha vichaara karee manee | Kee itukaa gaupya-artha medinee | Kona aahe majapaashee ||**

## Ovee 157

शिंगी सारंगी कुबडी फावडी । मुद्रा शैली कंथा घोंगडी । पात्र भोपळा संपदा एवढी । आम्हांपाशी विराजे ॥

### Transliteration

**Shingee saarangee kubadee phaavadee | Mudraa shailee kanthaa ghongadee | Paatra bhopalaa sampadaa evadhee | Aamhaam-paashee viraaje ||**

## Ovee 158

याविरहित आणिक दुसरा । अर्थ न राहिला आमुच्या आश्रया । परी यानें कल्पिलें काय अंतरा । हे तो कांहीं कळेना ॥

### Transliteration

**Yaavirahita aanika दुसरा | Artha na raahilaa aamuchyaa aashrayaa | Paree yaane kalpile kaaya antaraa | Hey toh kaanhee kalenaa ||**

### Ovee 159

यापरी आणी विचार चित्तीं । कीं अवसर लोटला मध्यरात्रीं । त्यांतही स्त्रीदेशाप्रती । पुरुष आले हें कैसें ॥

**Transliteration**

**Yaaparee aanee vichaara chittee | Kee avasara lotalaa madhya-raatree | Tyaata-hee Stree-deshaa-pratee | Purusha aale hey kaise ||**

### Ovee 160

तरी हे मानव सहसा नसती । स्वर्ग सुखाचे पात्र असती । शुक्र कीं वरुण गभस्ती । वाचस्पति पातलेति ॥

**Transliteration**

**Taree hey maanava sahasaa na-satee | Svarga sukhaache paatra asatee | Shukra kee Varuna gabhastee | Vaachaspati paatale||**

### Ovee 161

कीं मंगळ किंवा विरिची सुंदर । कीं गण गंधर्व साचार । कीं यक्ष रक्ष अश्विनीकुमर । कीं तपोलोकादि पातले ॥

**Transliteration**

**Kee mangala kimvaa virichee sundaru | Kee gana kimvaa Gandharva saachaaru | Kee yaksha raksha Ashvineek-umaru | Kee tapolo-kaadi paatale ||**

### Ovee 162

नातरी व्हावया आगमन । मानवा नसेही साधन । तरी हे देवचि निश्चयवचन । मानवी कृत्य नसेचि ॥

**Transliteration**

**Naataree vhaavayaa aagamanu | Maanavaa nas-ehee saadhanu | Taree hey devachi nishchaya-vachanu | Maanavee kritya nasechi ||**

### Ovee 163

ऐसें भावूनि दृढ चित्तांत । आणि विचारी हृदयांत । कवण कामना आहे यतिं । शोध करुं तयाचा ॥

**Transliteration**

**Aise bhaavuni dridha chittaantu | Aani vichaaree hridaya-antu | Kavana kaamanaa aahe yati | Shodha karu yaachaa ||**

### Ovee 164

म्हणूनि अंतरदृष्टीं अंतःकरणीं । करुनि विचार शोधी मुनी । परी कांहीं एक अर्थ तों तरणी । आश्रयातें लागेना ॥

**Transliteration**

**Mhanooni antara-drishtee antah-karanee | Karuni vichaara shodhee Munee | Paree kaanhee eka artha toh taranee | Aashra-yaate laagenaa ||**

### Ovee 165

मग म्हणे असो कैसें । आपण चालिलो ज्या कार्यास । तितुकें भिन्न करुनि यास । मागेल तेंचि आदरुं ॥

#### Transliteration

**Maga mhane aso kaise | Aapana chaalilo jyaa kaaryaasu | Tituke bhinna karuni yaasu | Maagela tenchi aadaru ||**

### Ovee 166

aisa विचार करुनि मनीं । बोलतां झाला प्रसिद्धपणीं । म्हणे महाराजा भूदेवतरणी । तुम्हीं सहसा नोहेती ॥

#### Transliteration

**Aisaa vichaara karuni manee | Bolataa jhaalaa prasiddha-panee | Mhane Mahaaraajaa bhoo-devataranee | Tumhee sahasaa nohetee ||**

### Ovee 167

काय प्राप्ती द्विजवरा । चालूनि येईल येथवरा । काळकृतांत सीमेवरा । चतुर्थअस्त्र विराजती ॥

#### Transliteration

**Kaya praaptee dvija-varaa | Chaaluni yaeela yethavaraa | Kaala-kritaanta seemevaraa | Chaturth-aastra viraajatee ||**

### Ovee 168

प्रतापार्क वायुकुमर । ते रश्मीतसें भुभुःकार । यावरी प्रेरिला वैश्वानर । चतुर्थास्त्र प्रतापी ॥

#### Transliteration

**Prataapa-Arka Vaayu-kumaru | Tey rashmeetase bhubhuh-kaaru | Yavaree prerilaa vaishvaanaru | Chaturth-aastra prataapee ||**

### Ovee 169

ऐशिया संकटीं भूदेवराया । कोण रेवाण येईल उपाया । शिवहालातें प्राशिलिया । वाचेल ऐसें वाटेना ॥

#### Transliteration

**Aishiyaa sankatee bhoo-devaraayaa | Kona revaana yaeela upaayaa | Shivahaalaate praashiliyaa | Vachela aise vaatenaa ||**

### Ovee 170

कीं दहन आकाशीं कवळितां । येथें पतंग मिरवी आपुली वीर्यता । कीं मशक मेरुते वाहुनि तोली वरता । जात थिल्लरी बुडवावया ॥

#### Transliteration

**Kee dahana aakaashee kavalitaa | Yethe patanga miravee aapulee veeryataa | Kee mashaka merute vaahuni tolee varataa | Jaata thillaree buda-vaavayaa ||**

## Ovee 171

तेवीं येथें यावयाकारण । कदा न पावे मनुष्या गमन । तरी महाराजा प्रज्ञावान । कोण तुम्हीं तें सांगा ॥

### Transliteration

**Tevee yethe yaavayaa-kaaranu | Kadaa na paave manushyaa gamanu | Taree Mahaaraajaa prajnyaa-vaanu | Kona tumhee tey saangaa ||**

## Ovee 172

ऐसें बोलूनि माथा चरणीं । ठेविता झाला सलीलपणीं । मग एकमेकांतें विलोकुनी । हास्यवदन करिताती ॥

### Transliteration

**Aise boluni maathaa charanee | Thevitaa jhaalaa saleela-panee | Maga eka-mekaante vilokunee | Haasya-vadana karitaa-tee ||**

## Ovee 173

याउपरी बोले रघुनंदन । आतां यातें ठेवणें भिन्न । हें योग्य मातें न ये दिसून । स्वपंकजा दावावया ॥

### Transliteration

**Yaauparee bole Raghu-nandanu | Ataan yaate thevane bhinnu | Hey yogya maate na ye disunu | Svapankajaa daavaavayaa ||**

## Ovee 174

ऐसें वदतां रघुपती । मान तुकावी प्राज्ञमूर्ती । मग प्रकट करुनि स्वरुपप्राप्ती । नाथ हृदयीं कवळिला ॥

### Transliteration

**Aise vadataa Raghu-patee | Maana tukaavee praajnya-moortee | Maga prakata karuni svarupa-praaptee | Naatha hridayee kavalilaa ||**

## Ovee 175

म्हणे वत्सा ऐक वचन । कामें वेधला वायुनंदन । कीं मच्छिंद्रयतीलागून । नेऊं नये स्वदेशीं ॥

### Transliteration

**Mhane vatsaa aika vachanu | Kaame vedhalaa Vaayu-nandanu | Kee Machchindra-yatee-laagunu | Neoo naye svadeshee ||**

## Ovee 176

मैनाकिनी नृपदारा । परम आचरली तपाचारा । वचनीं गोंवूनि वायुकुमारा । नाथ मच्छिंद्रातें मागितलें ॥

### Transliteration

**Meinaakinee nripadaaraa | Parama aacharalee tapaa-chaaraa | Vachanee govuni Vaayu-kumaaraa | Naatha Machchindraate maagitale ||**

## Ovee 177

तरी यशाची उभवूनि कोटि । प्रेरिला आहे मच्छिंद्रजेठी । तरी हा अर्थ मारुतीचे पोटीं । पूर्णपणीं मिरवला ॥

### Transliteration

**Taree yashaachee ubhavuni koti | Prerilaa aahe Machchindra-jethee | Taree haa artha Maarutee-che potee | Poorna-panee miravalaa ||**

## Ovee 178

याविरहित मागणें तुजसी । कांहीं नाहीं तपोराशी । तरी तूं जाऊनि तया भेटीसी । श्रीनाथासी नेऊं नको ॥

### Transliteration

**Yaavirahita maagane tujasee | Kaanhee naahee taporaashee | Taree too jauni tayaa bheteesee | Shree-Naathaasee neoo nako ||**

## Ovee 179

ऐसें ऐकूनि लाघवी वचन । बोलता झाला गौरनंदन । हे महाराजा प्रज्ञावान । सत्य वचन बोलतसां ॥

### Transliteration

**Aise aikuni laaghavee vachanu | Bolataa jhaalaa Gauranandanu | Hey Mahaaraajaa prajnyaa-vaanu | Satya vachana bolatasaa ||**

## Ovee 180

परी पहा जी प्रज्ञावानराशी । आम्ही म्हणवितों योगाभ्यासी । तरी हे अनुचित कर्म आम्हांसी । प्रपंच विसरुं साजिरा ॥

### Transliteration

**Paree pahaa jee prajnyaa-vaanaraashee | Aamhee mhanavito yogaa-bhyaasee | Taree hey anuchita karma aamhaansee | Prapancha visaru saajiraa ||**

## Ovee 181

तरी इतुके काम करुनि भिन्न । मागाल तरी देईन प्राण । परी या देशीं मच्छिंद्र जाण । ठेवणार नाहीं सहसाही ॥

### Transliteration

**Taree ituke kaama karuni bhinnu | Maagaala taree deeena praanu | Paree yaa deshee Machchindra jaanu | Thevanaara naahee sahasaahee ||**

## Ovee 182

भूवरी आकाश अवघें पडो । मेरुमांदार उलथोनि पडो । कीं अवघीं मही रसातळीं बुडो । परी मी न ठेवी गुरुवर्या ॥

### Transliteration

**Bhoovaree aakaasha avaghe pado | Meru-maandaara ulathoni pado | Kee avaghee mahee rasaatalee budo | Paree mee na thevee guruvaryaa ||**

## Ovee 183

यावरी बोले रघुनंदन । इतुकें आमुचें करीं मान्य । गोरक्ष म्हणे पितरांकरण । घडूनि आल्या घडेना ॥

### Transliteration

**Yavaree bole Raghunandanu | Ituke aamuche karee maanyu | Goraksha mhane pitaraankaranu | Ghaduni aalyaa ghadenaa ||**

## Ovee 184

तरी शांतिमांदार रघुनंदन । हस्तकीं धरिला वायुनंदन । म्हणे बा सकळ प्रतापगुणसंपन्न । करशील कंदन निश्चयें ॥

### Transliteration

**Taree shaanti-maandaara Raghu-nandanu | Hastakee dharilaa Vaayu-nandanu | Mhane baa sakala prataapa-guna-sampannu | Karasheela kandan nishchaye ||**

## Ovee 185

ऐसें बोलता गौरनंदन । मारुतीसी क्रोध आला दारुण । रामासी म्हणे करीन कंदन । शब्दभ्रष्ट आतांचि ॥

### Transliteration

**Aise bolataa Gauranandanu | Maaruteesee krodha aalaa daarunu | Raamaasee mhane kareena kandanu | Shabda-bhrashta aataanchi ||**

## Ovee 186

परी इतुका अनर्थ कासयासाठीं । लघुकार्यातें आटा आटी । तुज या वचनाची वागवटी । फिटूनि गेला महाराजा ॥

### Transliteration

**Paree itukaa anartha kaasayaa-saathee | Laghu-kaaryaate aataa aatee | Tuja yaa vachana-achee vaagavatee | Phituni gelaa Mahaaraajaa ||**

## Ovee 187

आतां प्रारब्धयोग कैसा । घडूनि येई तयाच्या लेशा । परी त्या आपुल्या भाषा । सत्य करुनि शेवटविले ॥

### Transliteration

**Aataa praarabdha-yoga kaisaa | Ghaduni yeee tayaa-chyaa leshaa | Pree tyaa aapulyaa bhaashaa | Satya karuni shevatavile ||**

## Ovee 188

ऐशा युक्तीप्रयुक्तीकरुन । शांत केला वायुनंदन । मग गोरक्षा हृदयीं धरुन । रघुनंदन चालिला ॥

### Transliteration

**Aishaa yuktee-prayuktee-karunu | Shaanta kelaa Vaayu-nandanu | Maga Gorakshaa hridayee dharunu | Raghu-nandana chaalilaa ||**

## Ovee 189

गोरक्षें चरणीं घालूनि मिठी । म्हणे महाराजा अस्त्रें चावटीं । तूंतें केली असे पोटीं । क्षेमाब्धींत सांठविला ॥

#### Transliteration

**Gorakshe charanee ghaaluni mithee | Mhane Mahaaraajaa astre chaavatee | Toote kelee ase potee | Kshemaa-bdheenta saanthavilaa ||**

## Ovee 190

ऐसें विनवूनि वाणी रसाळ । बोळविला प्रतापशीळ । असो दशरथबाळ । स्वस्थानासी पातला ॥

#### Transliteration

**Aise vinavuni vaanee rasaalu | Bolavilaa prataapa-sheelu | Aso Dasharatha-baalu | Svasthaa-naasee paatalaa ||**

## Ovee 191

याउपरी पुढिले अध्यायीं कथन । श्रृंगमुरडा पाहील वायुनंदन । मैनाकिनी राज्यभाषण । गुप्तसूचना करील तो ॥

#### Transliteration

**Yaa-uparee pudhile adhyaayee kathanu | Shringa-muradaa (mukathaa) paaheela Vaayu-nandanu | Meinaakinee raajya-bhaashanu |Guru-soochanaa (Gupta-soochanaa) kareela toh ||**

## Ovee 192

ती कथा परम सुधारस सुंदर । श्रोत्यांसी सांगेल धुंडीकुमर । नरहरिवंशीं संतकिंकर । मालूवरी विराजला ॥

#### Transliteration

**Tee kathaa parama sudhaarasa sundaru | Shrotyaansee saangela Dhundee-kumaru | Narahari-vamshee santa-kinkaru | Maaloo-varee viraajalaa ||**

## Ovee 193

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । एकोनविंशाध्याय गोड हा ॥

#### Transliteration

**Svasti shree-bhakti-kathaa-saaru | Sammata Goraksha-kaavya Kimayaagaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Eko-navinshaadhyaaya goda haa ||**

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

***Shri Krishnarpanamastu***

***Shri Dattatreyarpanamastu***

इति श्रीनवनाथभक्तिसार एकोनविंशाध्याय संपूर्ण ।

***Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Ekonavimsha Sampurnah***